भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/१२/२०१६

**१) आदेशाचा भंग केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १५/१२/२०१६ रोजी २२.२० वा. दर. यातील फिर्यादी ह पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी हा. मा. जिल्हाधीकारी भंडारा यांचे आदेशाने नमुद केल्याप्रमाने विहीत वेळेपेक्षा जास्त कालावधी पर्यत आपले बार सुरू ठेऊन आदेशाचा भंग केल्याने सरतर्फे फिर्यादी उपवीभागीय पोलीस अधीकारी श्री. जोगदंड करीत याच्या आदेशाने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) खनीज चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/१२/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताबयातील ट्रक क्र. सीजी. ०४ जे.ए. ५०४५ मध्ये १६ टन मॅग्नीजयुक्त दगड भरून आणुन व ट्रक्टर क्र. सीजी. ०८ पी १४९१ ने प्रकीया करण्याकरीता वापर करून साखरा ढाबा येथे चोरीचे खनीज साठवुण करून क मध्ये भरलेला १६ टन कि. १३८८९६/–रू व ढाब्याच्या जागेत साढवुन ठेवलेला अंदाजे कि. १७३६२०/–रू चा एकुन कि. ३१२५१६/–रू चा माल शायनचे खनीजाची चोरी करून मिळुन आल्याने फिर्यादी सुधीर परमेश्वर खोब्रागडे वय ५२ वर्ष मंडळ अधीकारी बारव्हा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४८ (४)(५) महाराष्ट्र जमीन महसुल अधी. १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**३)विहीरीचे पाण्यात महीलेचा प्रेत तरंगताना मिळुन आले :–**

दिंनाक. १४/१२/२०१६ रोजी २२.०० वा. ते १६/१२/२०१६ चे ११.१५ वा दर. यातील मृतक सौ. देवकी श्रीराम नेवारे वय ५० वर्ष, रा. देवनारा ही घरी कोणालाही न सांगता घरून निघुन गेली होती ति आज दि. १६/१२/२०१६ चे ११.१५ वा. दर. आंबेटोला (चिखली) शेतशिवारीतील हरीचद्र भलावी रा. बिटपुर यांचे शेतातील विहीरीचे पाण्यात तिचे प्रेत मृत अवस्थेत तरंगतांना मिळुन आल्याने फिर्यादी रामेश्वर श्रीराम नेवारे वय २१ वर्ष रा. देवनारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गेडाम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १६/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.